# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा : मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अकोला यांचे परिपत्रक क्र. निवडणूक/म.स.२/कावि-५४९/२०२४, दिनांक १०/१०/२०२४.

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/विसानि/२२९६/२०२४ दिनांक : १८ /१०/२०२४

मा. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चे अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. तसेच माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ मध्ये मोठया प्रमाणावर शासकीय सुट्टया येत असल्यामुळे आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यापीठातील सर्व कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच अधिनस्त सर्व कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी, शाळा / महाविद्यालयांतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या अपरिहार्य कारण व वैद्यकीय कारणाव्यतिरीक्त कुठलिही अर्जित / दीर्घ मुदतीची रजा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पुर्व परवानगीशिवाय मंजूर करण्यात येऊ नये. त्यांना मुख्यालयी उपस्थित राहून त्यांना नेमून दिलेले निवडणूकीचे कामकाज करण्याबाबत सुचित करणेबाबत संदर्भिय परिपत्रकाव्दारे सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच अधिकारी / कर्मचारी, शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे निवडणूक कामकाजामध्ये व्यत्यय निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील, असे सुध्दा नमुद आहे.

करीता विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी, कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

कुलसचिव १८/१०
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलीपी :**

१) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अकोला यांना माहितीकरीता.
२) संचालक (सर्व) ---------------------------------------------------------------
३) अधिष्ठाता (सर्व) ---------------------------------------------------------------
४) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) -----------------------------------------------------
५) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ------------------------------------------------
६) प्रभारी अधिकारी (सर्व) -------------------------------------------------------
७) प्रभारी अधिकारी, (ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
८) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) --------------------------------
९) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी
१०) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि.),
११) सहायक कुलसचिव (आस्था/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.)
१२) सहायक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी, अकोला

(कृ.म.पहा)